अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# अंशत: अहवाल स्वीकारून सरकार आणखी संशयात

मुंबईतल्या आदर्श इमारतीचा घोटाळा आणखी गाजत ठेवायचा अशी सरकारची इच्छा दिसते कारण या बाबतचा चौकशी समितीचा अहवाल सरकारने आधी फेटाळून लावला आणि नंतर राहुल गांधींच्या दबावामुळे तो अहवाल अंशत: स्वीकारण्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. या घोटाळ्यामध्ये अडकलेल्या सगळ्या पक्षाच्या नेत्यांना संरक्षण देण्यासाठी मुख्यमंत्र्यांचा आटापीटा सुरू आहे. दिल्लीचा दबाव आणि महाराष्ट्रातल्या नेत्यांचे हितसंबंध यामधून कसा मार्ग काढायचा. असा प्रश्न मुख्यमंत्र्यांना पडला असावा म्हणूनच त्यांनी दिल्लीला न दुखावता आणि राज्यातल्या नेत्यांची नाराजी न ओढवून घेता या घोटाळ्यावरचा अहवाल अंशत: स्वीकारण्याचे ठरवले. परंतु आदर्श इमारत प्रकरणातल्या चार नेत्यांना वाचवायचे की राज्यातल्या काँग्रेसला वाचवायचे. असा मोठा प्रश्न निर्माण होत आहे. कारण केंद्रामध्ये आपले सरकार डबघाईला आलेले आहे. अशा आशयाची घोषणा अलिकडेच पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी केली. नुकतीच झालेली त्यांची पत्रकार परिषद म्हणजे त्यांच्या कारकिर्दीतल्या पराभवाचाच पाढा वाचण्यासारखा होता. आपल्या कारकिर्दीत घोटाळे झाले, ही गोष्ट मान्य करून आम्ही महागाई रोखू शकलो नाही. अशी कबुलीही मनमोहन सिंग यांनी दिली आहे. त्यांची ही सगळी विधाने म्हणजे आपल्या सरकारने जनहिताचे निर्णय घेतले पण त्याचा उपयोग झाला नाही. असे सांगण्यासारखेच ठरते. दिल्लीमध्ये ही पराभवाची कबुली थेट पंतप्रधानांनीच दिली आहे त्यामुळे राज्यात पृथ्वीराजसुध्दा आपले राज्य वाचवू शकणार नाहीत. अशी आज परिस्थिती आहे. आदर्श इमारत गैरव्यवहाराने त्यांच्या सरकारची पूर्ण कोंडी केलेली आहे. याशिवाय महागाईपासूनही आपण राज्यातल्या जनतेला दिलासा देऊ शकलेलो नाही, एवढेच नव्हे तर अलिकडेच त्यांनी रेडी रेकनर आणि स्टँप ड्यूटीमध्ये वाढ करून सामान्य माणसाचे घराचे स्वप्नदेखील आणखीनच महाग केले आहे. जनतेला कोणत्याच प्रकारचा दिलासा दिल्लीने दिला नाही आणि महाराष्ट्राचा मान वाढावा असे कोणतेही काम चव्हाणांनाही केलेले नाही. अशा परिस्थितीत येणाऱ्या निवडणुका आपण खात्रीने जिंकू याची कोणालाच खात्री वाटत नाही. लोकसभा निवडणुका आणि राज्याच्या विधानसभा निवडणुका ही दोन्ही आव्हाने समोरासमोर असल्यामुळे कोणत्या मुद्दावर लोकांकडे मते मागायची असा मोठा संभ्रम काँग्रेसमध्ये निर्माण झाला आहे. आदर्श इमारत प्रकरणात सरकार काँग्रेसला वाचवणार की नेत्यांना तारणार. यावर या पक्षाचे भवितव्य अवलंबून राहणार आहे. घोटाळे करायचे. त्यावर चौकशा समित्या नेमायच्या आणि त्या समित्यांचे चौकशी अहवाल फेटाळून लावायचे. ही गोष्ट यापुढे लोकांना पसंत पडणार नाही. आदर्शइमारत प्रकरणामध्ये धडधडीतपणे भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाला. त्यातल्या दोषी लोकांविरुध्द कारवाई सुरू करण्याऐवजी सरकार भ्रष्टाचाराला संरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे.

### आठ कोटीला मुठमाती

या अहवालातून सरकारच्या भ्रष्टाचारी कार्यपध्दतीचे अक्षरश: वाभाडे काढले गेले आहेत. त्यात इतरही राजकीय पक्षांनी हात धुवून घेतले. बेनामी व्यवहार झाले आणि मनमानी पध्दतीने कर्जप्रकरणे करून अक्षरश: फ्लॅट बळकावले गेले. कोणत्याही इमारत बांधकामासाठी किंवा भूखंड हस्तांतरणासाठी जी काही शासकीय नियमावली आहे त्याचे अजिबात सोयरसूतक आदर्श प्रकरणामध्ये ठेवले गेले नाही. समितीने गैरव्यवहार कसा कसा झाला आणि नियम कसे कसे डावलले गेले, मंत्र्यांनी अधिकाऱ्यांनी आपल्या कक्षेबाहेर जाऊन कशी कामे करवून घेतली याचे उदाहरणासकट वर्णन या अहवालामध्ये केले आहे. याचा अर्थ गैरव्यवहार झाला, भ्रष्टाचार झाला यामध्ये संशयालाही जागा उरत नाही, असे असताना हा अहवाल अंशत: स्वीकारून सरकारने पुन्हा संशयालाच जागा ठेवली. फेटाळलेला अहवाल अंशत: स्वीकारल्यामुळे सरकारचे पाय आणखीनच चिखलात फसले आहेत. एक पाय काढायला गेल्यानंतर दुसरा पाय चिखलात रुतावा तसे सरकारचे झाले आहे. ज्या समितीला चौकशी करण्याकरता नेमले गेले त्याने आपले काम व्यवस्थितपणे पार पाडले. तब्बल आठ कोटी हा अहवाल तयार करण्यासाठी खर्च झाले आहेत. एवढा खर्च झाल्यानंतर सगळा अहवालच फेटाळणे म्हणजे आठ कोटीलाच मुठमाती देण्यासारखे होते. याविरुध्द जेव्हा दिल्लीपासून गल्लीपर्यंत आरडाओरडा झाला टिकाटिप्पणी झाली तेव्हा सरकारला आणि प्रामुख्याने मुख्यमंत्र्यांना थोडीफार सुबुध्दी सुचली आणि केवळ एक मलमपट्टी म्हणून हा अहवाल अंशत: स्वीकारण्याचा देखावा केला गेला आहे. त्यातून काँग्रेसला स्वत:चे तोंडही लपवता येणार नाही आणि निवडणुकांमध्ये तोंड दाखवायलाही जागा उरणार नाही अशी आज परिस्थिती आहे. मोकळेपणाने गैरव्यवहार झाल्याचे मान्य करून त्यातल्या संबंधितांविरुध्द चौकशी किंवा कारवाई करणे हे अधिक समंजसपणाचे ठरले असते आणि राजकीय दृष्ट्या काँग्रेसला फायद्याचेही ठरले असते.

### कमकुवत विरोधी पक्ष

दुर्दैव असे आहे की सगळेच राजकीय पक्ष एकाच माळेचे मणी आहेत. आज भारतीय जनता पार्टीने आदर्श अहवाल प्रकरणात कोर्टात जाण्याचे ठरवले आहे. परंतु भारतीय जनता पार्टीने येडीयुरप्पा यांना पुन्हा पक्षामध्ये सामील करून घेतले. त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे पुन्हा आरोप झाले असतानाही त्यांना पुन्हा पक्षात सामील करून घेऊन भ्रष्टाचाराशी भाजपाने कशी तडजोड केली. हेच सिध्द होते आणि आदर्श प्रकरणातसुध्दा या पक्षाचे काही नेते अडकलेले आहेत. त्यामुळे नैतिकतेचा आव आणून काँग्रेसवर भाजपाने कितीही टीका केली तरी लोकांचा त्यावर विश्वास बसणार नाही उलट आदर्श प्रकरणामध्ये विरोधी पक्ष जर धुतल्या तांदळासारखा स्वच्छ असता तर त्याचा एक नैतिक दबाव निर्माण झाला असता आणि सरकारला थेट राजीनामा द्यायला लावेपर्यंत हाच विरोधी पक्ष आक्रमक राहू शकला असता. ही परिस्थिती नसल्यामुळेच आज काँग्रेसने सगळा अहवाल फेटाळण्याचे धैर्य दाखवले आणि या प्रकरणात विरोधी पक्ष काही करू शकत नाही हे माहीत असल्यामुळे तोच अहवाल अंशत: स्वीकारण्याचा डावपेच सरकारने खेळला आहे. इथेच आदर्श या शब्दाची आणि नीतिमूल्यांची मोठी पडझड केलेली दिसून येते.